MAHARASHTRA METRO RAIL CORPORATION LIMITED

(Pune Metro Rail Project)

- MAHA METRO to Prepare DPR for Metro Neo for Warangal, Telangana
- Telangana Govt Announces Handing Over Preparation of DPR to Metro Neo to Maha Metro

Pune, 10th December: Maha Metro Pune has been awarded consultancy for Metro Neo project in Warangal, State of Telangana. This was announced after a high-power meeting held at Hyderabad by Government of Telangana, yesterday (9th December). Thus Maha Metro's capability, experience and innovative solution in providing economical, safe, reliable rubber-tyre Metro has been recognised not only within Maharashtra but also in other parts of India.

The first state other than Maharashtra, to recognise Maha Metro expertise in finding cost effective solution for Metro services, thus, is Telangana State where presentation was made by Maha Metro team consisting of MD Dr Brijesh Dixit and Director (Project) Shri Mahesh Kumar yesterday in presence of Hon Minister for Municipal Administration & Urban Development Hon Shri K T Rama Rao, elected representatives, Principal Secretary, Shri Arvind Kumar and other senior IAS officials of State of Telangana.

There after Hon Minister requested Maha Metro to take up the assignment of preparation of Detail project Report (DPR) for rubber tyre metro for Warangal district for a length of 10-15 km. It's a matter of great satisfaction that a cost effective solution which is at a one third cost as compared to conventional system is being planned in Warangal district, other than Nasik district of Maharashtra state. The cost of conventional Metro project being executed by other states is Rs.250 crore per km, while Maha Metro is executing the same project at Rs.180 crore per km. Metro Neo will cost just Rs.72 crore per km.

It may be recalled that a high-level delegation of elected representatives and officials from Telangana had visited Nagpur Metro project last month (19th November) for study of Double Decker system and overall Metro Project work. The team held extensive discussions with Maha Metro officials, where presentation was given followed by site visit. The team was quite impressed with project and had sought Maha Metro help in building similar infrastructure work in Telangana state. Soon after Nagpur visit, Maha Metro team was invited by Telangana Chief Minister Shri K Chandrashekar Rao for detail presentation on the innovative solution prepared by Maha Metro.

In a recent meeting held at Delhi by Ministry of Housing and Urban Affairs (MoHUA), this cost-effective solution named as `Metro Neo' was accepted for Tier-II and Tier-III cities of India. Even for Tier-I cities, it can be adopted as a feeder service. The model developed for Nasik was discussed on various forums and Government of India on 21st August 2019, constituted a committee under chairmanship of Dr Brijesh Dixit for standardization of detail specifications for Rubber-Tyre Mass Rapid Transportation System (MRTS) with a view to implement this across India. It may be recalled that Government of Maharashtra has already entrusted the task of providing Metro Neo transport system for Nasik to Maha Metro.

Thus after successfully concluding DPR work for Thane and Metro Neo project for Nasik, Maha Metro has bagged yet another prestigious work in Telangana State. As part of Metro Neo project, length of Bus Coaches will be 25/18 meter with carrying capacity of 200/300 passengers. The buses run on rubber-tyre and draw power from overhead electric wire having 600-750 V DC supply. The buses take power form overhead electric wire similar to railway system.

With Warangal, Telangana Maha Metro has yet another feather in its cap. With Nagpur project being executed successfully, this development is a big milestone for Maha Metro.

Photo Caption: The Hon Minister for Municipal Administration & Urban Development, Govt. of Telangana Shri. K T Rama Rao felicitating MAHA METRO MD Dr.Brijesh Dixit during the meeting.



महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(पुणे मेट्रो रेल प्रकल्प)

- महा मेट्रो तयार करणार वारंगलकरिता (तेलंगणा राज्य) मेट्रो नियोचा डीपीआर
- तेलंगणा सरकारने मेट्रो नियोचा डीपीआर महा मेट्रोद्वारे तयार करण्याकरिता दिली मंजुरी

पुणे १० : काल दिनांक ९ डिसेंबर रोजी हैद्राबाद येथे तेलंगणा सरकारने घेतलेल्या उच्च स्तरीय बैठकित वरंगल शहराकरिता मेट्रो नियो प्रकल्पाच्या डीपीआर (विस्तुत प्रकल्प अहवाल) तयार करण्याचे कार्य महा मेट्रोला देण्यात आले. महा मेट्रोच्या कार्याची क्षमता,अनुभव आणि आर्थिक, सुरक्षित, विश्वासाई रबर-टायर सेवा अश्या अभिनव उपक्रमाला महाराष्ट्र नव्हे तर देशातील इतर शहरामध्ये देखील मान्यता मिळाली आहे. या संदर्भात महा मेट्रोच्या टीमने तेलगांणा सरकारला सादरीकरण केले. महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित व संचालक (प्रकल्प) श्री. महेश कुमार यांनी तेलंगणा राज्याचे पालिका प्रशासन व नगर विकास मंत्री श्री. के. टी. रामा राव, प्रधान सचिव श्री. अरविंद कुमार आणि तेलंगणा राज्याचे इतर वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर मेट्रो नियो प्रकल्पाचे सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर मा. मंत्री श्री. के. टी. राव यांनी वारंगल जिल्ह्याकरीता १०-१५ कि.मी. इतक्या रबर टायर मेट्रो प्रकल्पाचे डीपीआर तयार करण्यासंदर्भांची विनंती केली. समाधानकारक बाब म्हणजे पारंपारिक व्यवस्थेच्या

तुलनेत फक्त एक तृतीयांश खर्च या प्रकल्पामध्ये खर्च होत असून महाराष्ट्र राज्याच्या नाशिक जिल्ह्या व्यतिरिक्त वरंगल जिल्ह्यात  हा नियोजित करण्यात येत आहे.

इतर राज्यामध्ये पारंपारिक पद्धतीद्वारे मेट्रो प्रकल्प राबविण्याची किंमत रु. २५० कोटी प्रति कि.मी. असून महा मेट्रो द्वारे राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पाची किंमत रु. १८० कोटी प्रति कि.मी इतकी आहे तसेच मेट्रो नियो प्रकल्पा राबविण्याकरिता फक्त रु. ७२ कोटी प्रति कि.मी एवढा खर्च येईल.

१९ नोव्हेंबर २०१९ रोजी तेलंगणा राज्याच्या उच्च स्तरीय शिष्टमंडळाने नागपूर मेट्रो प्रकल्पाचा दौरा केला होता ज्यामध्ये त्यांनी डबल डेकर उड्डानपूल आणि नागपूर मेट्रो रेल प्रकल्पाची पाहणी केली होती. शिष्टमंडळाने प्रकल्पाच्या उल्लेखनीय कार्याची प्रशंसा करत तेलंगणा राज्यात निर्माणाधीन व प्रस्तावित प्रकल्पात असे निर्माण कार्य व्हावे, यासाठी महा मेट्रोने सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. तेलंगणा राज्याच्या शिष्टमंडळाने नागपूर मेट्रोचा दौरानंतर तेलंगणाचे मुख्यमंत्री श्री. के. चंद्रशेखर राव यांनी महा मेट्रोने तयार केलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाच्या सादरीकरणासाठी महा मेट्रोला निमंत्रित केले.

नुकतेच दिल्ली येथे गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाच्या (एमओएचयुए) अधीन झालेल्या बैठकीमध्ये सदर प्रकल्पाला प्रभावी उपाय म्हणून 'मेट्रो नियो'   प्रकल्प सादर झाला असून सदर प्रकल्प देशातील टीयर-२ आणि टियर-३ शहरांसाठी स्वीकारला गेला. तसेच टीयर-१ शहरामध्ये फिडर सर्विस म्हणून उपयुक्त असे निश्चित करण्यात आले. २१ ऑगस्ट २०१९ रोजी महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापित केली आणि टायर वर धावणारी जलद गती सार्वजनिक वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासंबंधी सर्व बाबींवर विचार करण्याकरता तसेच या बाबतीत एकवाक्यता निर्माण करण्याकरता या समितीची स्थापना करण्यात आली असून महा मेट्रोला राज्य शासनाने नाशिक शहराकरिता मेट्रो नियोचे कार्य सोपविले आहे.

ठाणे आणि नाशिक शहराकरिता मेट्रो नियो प्रकल्पाचा डीपीआर यशस्वीपणे साकार केल्यानंतर महा मेट्रोला तेलंगणा राज्यात आणखी एक महत्वाचे कार्य मिळाले आहे. मेट्रो नियो प्रकल्पाच्या कोचेसची लांबी २५ x १८ मीटर असून याची प्रवासी क्षमता २०० ते ३०० इतकी असते या बसेस रबर टायर वर चालत असून वर असलेल्या (रेल्वे सिस्टिम सारखे) ६००-७५० वोल्ट इतक्या ईलेक्ट्रीक वायरच्या माध्यमाने यांना वीज पुरवठा होईल.

नागपूर आणि पुणे शहराच्या मेट्रो रेल प्रकल्पाचे कार्य उत्कृष्टपणे पार पाडत तेलंगणा राज्याचे वारंगल शहराचे मेट्रो प्रकल्पाचे कार्य महा मेट्रोने विकासाचा आणखी एक मोठा मैलाचा दगड गाठला आहे.

फोटो: तेलंगणा राज्याचे पालिका प्रशासन व नगर विकास  मंत्री श्री. के. टी. रामा राव यांनी महा मेट्रो व्यवस्थापकीय संचालक डॉ.ब्रिजेश दीक्षित यांचा सत्कार केला.